हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृति समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

दिनांक : १६.२.२०१५

प्रति, माननीय संपादक/पत्रकार

कृपया प्रसिद्धीसाठी

## 'पीडीलाईट आस्थापना'ने केला भारतीय जवानांचा अपमान

## 'पीडीलाईट आस्थापना'ने भारतीय लष्कराची जाहीर क्षमा मागून दूरचित्रवाणीवरील विज्ञापन तात्काळ मागे घ्यावे ! - हिंदु जनजागृती समितीची मागणी

मुंबई - १५ फेब्रुवारी या दिवशी 'विश्वकप २०१५' च्या भारत-पाकिस्तान यांच्या दरम्यान झालेल्या क्रिकेटच्या खेळाच्या कालावधीत 'पीडीलाईट' या आस्थापनेने त्यांचे उत्पादन 'फेवी क्विक' खपवण्यासाठी एक अत्यंत हीन विज्ञापन दाखवले आहे. या विज्ञापनात 'वाघा बॉर्डर'वर नियमितपणे होणाऱ्या 'रिट्रीट'मध्ये ('झेंडा उतरवण्या'चा कार्यक्रम) पाकिस्तानी सैनिकाचा फाटका बूट भारतीय जवान 'फेवी क्विक'च्या साहाय्याने चिकटवतो, असे दाखवले आहे. भारतीय जवान रात्रंदिवस त्यांचा जीव धोक्यात घालून आपल्या देशाचे रक्षण करत असतांना लष्कराच्या जवानाने बूट चिकटवण्याच्या निमित्ताने पाकिस्तानच्या पाया पडावे, हे कोणत्याही स्थितीत खपवून घेण्यासारखे नाही. या विज्ञापनामुळे कोट्यवधी भारतियांच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनांना ठेच पोहोचवली आहे. त्यामुळे 'पीडीलाईट आस्थापने'ने भारतीय लष्कराची जाहीर क्षमा मागून दूरचित्रवाणीवरील विज्ञापन तात्काळ मागे घ्यावे, अशी मागणी हिंदु जनजागृती समिती करत आहे. या संदर्भात 'पीडीलाईट' या आस्थापनेकडे निषेधाचे निवेदन पाठवण्यात आले आहे.

या विज्ञापनात भारतीय जवान 'फेवीक्विक'च्या साहाय्याने बूट जोडतांना 'तोडो नही जोडो', असे म्हणतांना दाखवण्यात आले आहे. या वाक्यामुळे 'आमचा देश आणि जवान दोन्ही देशातील संबंध बिघडवण्यास कारणीभूत आहेत आणि जवानांमुळे ताण वाढत आहेत', असा संदेश देण्यात येत आहे. हा केवळ भारतीय जवानांचाच नव्हे, तर संपूर्ण देशवासियांचा अवमान आहे. पाकिस्तानी जवानांची अशी कोणतीही लायकी नाही की, भारतीय जवानांनी त्यांच्या पाया पडावे.

या संदर्भात 'पीडीलाईट' या आस्थापनेस आम्ही लक्षात आणून देऊ इच्छितो की, वर्ष १९४७ मध्ये संपूर्ण भारताचे दोन तुकडे होऊन पाकिस्तानला धर्माच्या आधारावर स्वतंत्र राष्ट्र देण्यात आले. यानंतर पाकिस्तानने भारताप्रती कृतज्ञ, तर रहाणे दूरच उलट तीन वेळा भारताशी युद्ध करून त्यांचा द्वेष प्रकट केला आहे. सातत्याने विविध आतंकवादी कारवाया करून पाकिस्तान भारत तोडण्याचा प्रयत्न करत आहे. पाकिस्तानी जवान अनेक वेळा शस्त्रसंधीचे उल्लंघन करून गोळीबार करून सीमेवरील भारतियांना लक्ष करत आहेत. या गोळीबारीत काही वेळा लष्कराच्या जवानांना जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे 'पीडीलाईट' आस्थापनने भारतीय लष्कराची जाहीर क्षमा मागून दूरचित्रवाणीवरील विज्ञापन तात्काळ मागे घ्यावे, अशी मागणी आम्ही करत आहोत. या संदर्भात समिती कायदेशीर सल्ला घेत आहे. आस्थापनाने यावर तात्काळ कृती न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, अशी चेतावणीही देण्यात येत आहे.

आपला नम्र,

रमेश शिंदे

श्री. रमेश शिंदे
राष्ट्रीय प्रवक्ता, हिंदु जनजागृती समिती
संपर्क : ९९८७९६६६६६